# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २४/०८/२०२४ (शनिवार) सकाळ

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. बोरी :— दिनांक २३/०८/२०२४ चे १५.०० वा. ते १६.०० वा. दरम्यान बुट्टीबोरी पोलीस पथक पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, नागपूर ते बुट्टीबोरी हायवे रोडनी एक काळया रंगाचे अशोक लेलॅड क्र. एम.एच—४९/बि.झेड— ३३२३ मध्ये काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन बुट्टीबोरी पोलीस पथकाने नागपूर ते चंद्रपूर हायवे रोडवर वेणा नदीचे पुलाजवळ नाकाबंदी केली असता अशोक लेलॅड गाडी क्र. एम एच— ४९, बि झेड ३३२३ क्रमांकाच्या वाहनास थांबवुन तपासले असता सदर वाहनात **आरोपी वशिम गुलाब शेख रा कुंदनलाल गुप्ता नगर नागपुर** व सोबत **गाडी मालक_आकाश दिलीप लोखंडे, वय ३२ वर्ष, रा. गोरेवाडा माता मंदिर चौक**_यांनी आपले अशोक लेलॅड गाडी क्र. एम एच ४९, बि झेड ३३२३ किं ३,००,०००/— रू. मध्ये अवैधरित्या विनापरवाना काळया, लाल व पांढऱ्या रंगाचे एकुण पाच बैल जातीचे जनावरे कि. ६०,०००/— रू. असा एकुण ३,६०,०००/—रू. चा मुद्देमाल जनावरांना अवैद्यरित्या विनापरवाना कोंबुन, निर्देयतेने वागणुक देवून पाण्याची व चाऱ्याची सोय न करता वाहतुक करतांनी मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— राजकुमार धनराज अहिरवार वय ३९ वर्ष रा. टाकळघाट वार्ड क्र. ०५ त. हिंगणा जि. नागपुर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम ११(१)(g), ११(१)(c), प्रा. छळ प्रति अधिनियम सह ५, ९ सह १८४ मोवाका सह ४९ बीएनएस काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर श्रीमती पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनात पोस्टे बुट्टीबोरी येथील ठाणेदार पोनि प्रतापराव भोसले, पोउपनि पाथोडे मॅडम, पोअं. गजानन पंचबुधे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर